# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.04.2025** **वार-सोमवार**

---

**राखीव**

पुणे शहरातील जैवविविधता उद्यान राखीव टेकड्यांवर बांधकामाला परवानगी द्यावी का, याचा पुनर्विचार करण्यासाठी निवृत्त प्रशासकीय अधिकारी रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास गटाला ग्रीन पुणे मूव्हमेंट या संस्थेनं विरोध दर्शविला आहे. यासाठी परवानगी दिल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशारा ग्रीन पुणे मूव्हमेंटच्या वंदना चव्हाण यांनी दिला आहे. जैवविविधता उद्यानासाठी राखीव क्षेत्राचा निर्णय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये एकमतानं मंजूर झाला होता. 2015 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्याला पाठिंबा दिला होता. 2018 मध्ये जमीनधारकांना भरपाई देण्याची घोषणादेखील करण्यात आली होती. त्यामुळं हा विषय आधीच निश्चित झालेला असताना आता त्यावर कोणताही पुनर्विचार अस्वीकारार्ह असल्याची भूमिका वंदना चव्हाण यांनी मांडली आहे.

दरम्यान, कालच पुण्यात आयोजित 'पुणे अर्बन डायलॉग' मंथन कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं की, देशातील शहरं आज बकाल झालेली दिसतात. ग्रामीण भागातील नागरिक शिक्षण, आरोग्य, नोकरी, संधी, मनोरंजन आदीसाठी शहरात येतात. नदी नाले बुजवून अतिक्रमणं होतात. शहरं वाढल्यामुळं घनकचरा, सांडपाणी, पिण्याच्या पाण्याची समस्या, निर्माण होते आणि शहरे व्यवस्थापनाच्या बाहेर गेलेली, शाश्वत आणि राहण्यायोग्य राहिली नाहीत हे अचानक लक्षात येते.

**बीज**

सध्याच्या काळात विषयुक्त अन्नधान्यामुळं अनेक आजार वाढले आहेत त्यामुळं आरोग्य टिकविण्यासाठी देशी वाणाचा वापर करा, विषमुक्त अन्न खा, पुन्हा निसर्गाकडे चला, असा संदेश बीजमाता पद्मश्री पुरस्काराने सन्मानित राहिबाई पोपेरे यांनी आज पुण्यात दिला. सह्याद्री देवराई आणि भारती विद्यापीठ यांच्याद्वारे आयोजित बीज संमेलनात त्या बोलत होत्या. यावेळी राहिबाई पोपेरे यांचा ज्येष्ठ शास्त्रीय गायक आचार्य पंडित मुकुल शिवपुत्र यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. डॉ. विश्वजीत कदम यांनी डॉक्टर पतंगराव कदम फाउंडेशनच्या माध्यमातून सह्याद्री देवराईच्या उपक्रमांस 25 लाख रुपयांची देणगी जाहीर केली. विद्यार्थ्यांना झाडांची आणि बियांची ओळख, ती झाडं वाढेपर्यंत त्यांच्या देखभालीसाठी सक्रिय राहणे हा या संमेलनाचा उद्देश आहे.

**रस्ते**

पावसाळापूर्व कामं करण्यासाठी पुणे महापालिका प्रशासनानं वाहतूक पोलिसांकडे शहरातील रस्ते काही काळ बंद ठेवण्याची परवानगी मागितली होती. त्यानुसार, पोलिसांनी 61 ठिकाणी कामं करण्याची परवानगी दिली असल्याने हे रस्ते अल्प काळासाठी बंद राहणार आहेत. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी आज बातमीदारांना ही माहिती दिली.

**सेवाहक्क**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं सेवा हक्क दिन आणि महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 च्या दशकपूर्तीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. या उपक्रमांमध्ये मुख्य प्रशासकीयसह इतर कार्यालयांमध्ये सेवेची बांधिलकी जपण्याची शपथ सर्व कर्मचाऱ्यांना देण्यात आली आहे. आरोग्य विभागामार्फत गर्दीच्या ठिकाणी, पर्यटन स्थळे,

तीर्थक्षेत्रे इथं सेवा हक्क नियमांचे फलक घेऊन जनजागृती करण्यात येत आहे. पथनाट्य,मेळावे , बैठकांद्वारे झोपडपट्टी आणि बचत गटांमध्ये सेवा हक्क अधिनियमाची माहिती दिली जात आहे.

**<u>वडापाव</u>**

पुणे विमानतळाच्या नवीन टर्मिनलमध्ये आजपासून उडान यात्री कॅफे ही अहोरात्र सुविधा केंद्रिय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सुरु करण्यात आली. इथे प्रवाशांना वीस रूपयांत वडापाव, दहा रूपयांत पिण्याच्या पाण्याची बाटली उपलब्ध असेल. पुणे विमानतळावर आजच झालेल्या विमानतळ सल्लागार समितीच्या बैठकीची माहिती देताना मोहोळ म्हणाले की जुन्या टर्मिनलच्या नुतनीकरणाचं काम सुरू करण्यात आलं आहे. धावपट्टी वाढवण्यासाठी दोनशे एकर जागा ताब्यात घ्यावी लागेल. संरक्षण खात्याकडून 25 एकर जागा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. चार मेट्रोंचे मार्ग विमानतळाशी जोडण्यासाठी मनपानं विकास प्रकल्प अहवाल तयार करणं अपेक्षित आहे.

**<u>मध</u>**

महाबळेश्वर इथल्या मध संचालनालयाचा आरोग्यवर्धक सेंद्रिय ॲगमार्क आयएसआय दर्जा प्राप्त असलेला 'मधुबन' सेंद्रिय मध पुण्यातील वाकडेवाडी मध विक्री केंद्रात उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तो खरेदी करण्यांचं  आवाहन या मध विक्री केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी खादी आणि ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रविंद्र साठे यांनी केलं.

**<u>योगासन</u>**

नवी दिल्लीत आयोजित आशियाई योगासन स्पर्धेत पुण्याच्या गार्गी योगेश भट हिनं भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करताना दोन सुवर्णपदकं मिळवली. कनिष्ठ गटात आर्टिस्टिक पेअर विभागात अंजली विश्णोईच्या साथीत आणि आर्टिस्टिक ग्रुप विभागात तृप्ती डोंगरे, सी.ओवीया, दिपा लोधी आणि अंजली विश्णोई यांच्या साथीनं तिनं सुवर्णपदक पटकावलं. गार्गीनं आतापर्यंत योगासनामध्ये राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये नऊ सुवर्ण, पाच रौप्य, तीन कास्य पदकं जिंकली आहेत तर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहा सुवर्ण, एक रौप्य आणि पाच कास्य पदकांची कमाई केली आहे.

**<u>फुटबॉल</u>**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन यांच्यावतीनं आयोजित 'महाराष्ट्र राज्य आंतर-जिल्हा अजिंक्यपद' फुटबॉल वरिष्ठ गटाच्या मुलांच्या स्पर्धेत पुणे जिल्हा संघानं औरंगाबाद संघाचा 1-0 असा पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला. हर्ष उत्तेकरनं एकमेव विजयी गोल केला.

पुणे आणि परिसरात उन्हाची लाहीलाही होत आहे. दैनंदिन कमाल तापमान 40 अंश किंवा त्याहून अधिक राहात आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**